# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 26/11/2019 (मंगळवार)
# (सायंकाळ)

---

## विनयभंग

पो.स्टे. बेला :– दि. 21/11/2019 चे 12:00 वा. चे सुमारास 29 वर्षीय पीडित/फिर्यादी ही घरी एकटया असतांना आरोपी नामे– नितीन दशरथ धाबर्डे, वय 32 वर्ष, रा. मानोरी, ता. उमरेड, जि. नागपूर याने घरात प्रवेश केला. तसेच आरोपीने पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. पीडिता ओरडली असता पीडितेचा दीर आला व आरोपीला पकडण्याचा प्रयत्न केला असता आरोपीने तेथुन पळ काढला. तसेच आरोपीने पीडीतेस कोणाला काही सांगितल्यास जिवे मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. बेला येथे आरोपीविरुध्द कलम 354(अ), 452, 506 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा हवा गणेश रॉय 9764382179 हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

1) पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 10 कि.मी. अंतरावरील जाकेगाव शिवार येथे दिनांक 25/11/2019 चे 14:30 वा. दरम्यान फिर्यादींचा भाऊ नामे– भालेश्वर विजय मारवाडे, वर्ष 23 वर्ष, रा. गरदेव चौक मौदा हा त्याच्या एमएच– 40/एक्स– 2064 क्रमांकाच्या मोटरसायकलने जाखेगाव येथे जात होता. दरम्यान अज्ञात वाहन चालक आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन भालेश्वर मारवाडे याच्या मोटरसायकला धडक दिली. या अपघातात भालेश्वर मारवाडे याचा जागीच मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– विक्की विजय मारवाडे, वय 21 वर्ष, रा. गरदेव चौक, मौदायांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. 184, 134, 177 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री काळे हे करीत आहे.

2) पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत 2 कि.मी. अंतरावरील पारशिवनी नवेगाव खैरी रोड बोरभन जवळ येथे दिनांक 25/11/2019 चे 19:00 वा. दरम्यान एमएच– 40/यु– 5769 क्रमांकाची हिरो होंडा स्प्लेंडर मोटरसायकलचा चालक आरोपी/मृतक नामे– अमोल असाराम उईके, वय 25 वर्ष, रा. सुवरधरा याने फिर्यादी नामे– मुकेश व्यंकट कुंभरे, वय 23 वर्ष, रा. सुवरधरा यास मोटरसायकलवर मागे बसवुन त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन कोणत्यातरी चार चाकी वाहनाला धडक दिली. या अपघातात मोटरसायकल चालक आरोपी अमोल उईके हा स्वतःच्या मरणास कारणीभूत ठरला. तर फिर्यास हे जखमी झाले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री. पळनोटे 7387086178 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर